# व्यक्ती-वल्ली - टेनिस मधील ग्रँड स्लॅम बॉस, बॉब महादेवकर:

जन्म शताब्दी वर्ष मे, १९२० - २०२१

नमस्कार,

माझी जिद्द, महत्वाकांक्षा व चिकाटी लक्ष्यात घेता माझ्या नशिबात कांही महत्वाच्या दुर्मिळ व अशक्य गोष्टी फार उशिरा पदरात पडल्या. तरीही मी आशावादी आहे. आजचा हा माझा लेख ज्या व्यक्तीवर आहे ती व्यक्ती कदाचित आपल्याला माहित नसेल किंवा ती व्यक्ती विस्मृतीत गेली असेल ही शक्यता अधिक असावी असा तर्क. शीर्षक आहे 'टेनिस मधील ग्रँड स्लॅम बॉस, बॉब महादेवकर.' हे आमच्या दादर शिवाजी पार्कचे. मी शाळेत अर्ध्या चड्डीत (लहान) असतांना टेनिसमधील अंपायर म्हणून यांचं नांव व कीर्ती ऐकिवात होतो. चाळीस वर्षांपूर्वी जेव्हा सरस्वतीची लेखणी हाती घेतली तेव्हापासून मी यांच्यावर चार शब्द लिहिण्यासाठी सरसावलो होतो. परंतु, म्हणावं तसा त्याला योग्य, यश अथवा मुहूर्त लागत नव्हता. त्यातून सदैव होणारी आमची अमेरिका, मुंबई, इतरस्त्र भटकंती होत असे. दुर्दैव व नशीब जरी असलं तरीही मुंबईत गेल्यावर मी महादेवकरांची माहिती मिळविण्यासाठी प्रयत्नशील होतो. आज चाळीस वर्षानंतर मला म्हणावं तसं नाही परंतु, बरीच खटपट केल्यानंतर गेल्या महिन्यात, फेब्रुवारी २०२० मध्ये, आम्ही मुंबईत गेलो असतांना यश आलं..! मंडळी, ईश्वरकृपेने कदाचित, बॉब साहेबांनीच माझी तळमळ बघून व ती हांक ऐकली असावी... असो. नेहमीप्रणे अत्यंत दुर्मिळ छायाचित्रांनी हा आजचा लेख नटलेला आहे. आणि याला बॉब महादेवकर यांचे धाकटे सुपुत्र व माझे स्नेही संजीव महादेवकर कारणीभूत आहेत. अगदी थोड्या अवधीत स्वतःचा अमूल्य वेळ बाजूला काढून, त्रास न मानता व माझ्यावर विश्वास ठेऊन परोपकारी संजीवने मला आनंदाने मदत केली. हा त्याचा साक्षेप मी कधीही विसरू शकणार नाही. त्यामुळे आजचा हा सोबतचा प्रदीर्घ व चित्रमय लेख ही आपल्याला एक खास मेजवानी आहे. सुदैव किंवा दैवयोग म्हणा. अथवा दुधात

साखर म्हणजे, मे २०२० महिन्यापासून बॉब महादेवकरांचं जन्म शताब्दी वर्ष साजरं होणार आहे. त्या निमित्ताने हा खास लेख. वाचून आपण निश्चित तृप्त व्हाल यात शंका नाही. तसं झालं तर आपण मला आनंदाने कळवालच याची खात्री बाळगतो. धन्यवाद.

आपला,

जयंत.

*Sharing is Caring...*

---



*१) रुबाबदार बॉब महादेवकर आपल्या हक्काच्या खुर्चीवर... खाली: 1) Wimbledon... 2) Australian Open... 3) French Open... 4) US Open... 5) Davis Cup... या सर्व ठिकाणी चीफ अंपायर म्हणून मठमोळ्या बॉब महादेवकरांनी अनेक वर्ष राज्य केलं होतं. हे निश्चितच अभिमानस्पद, गौरवास्पद व कौतुकास्पद होतं...*

THE CHAMPIONSHIPS WIMBLEDON | AO australian open | ROLAND GARROS PARIS | US OPEN A USTA EVENT | DAVIS CUP THE WORLD CUP OF TENNIS





*१-२-३) दुर्दैवाने बॉब यांच्याबरोबर कोण महत्वाच्या व्यक्ती आहेत याची माहिती मिळूं शकली नाही...*

काळ आहे १९६० मधील. बालमोहन शाळेत असतांना आमच्या वर्गात 'तारा भास्कर महादेवकर' नांवाची खिलाडू वृत्तीची अत्यंत कर्तबगार, हुशार, हरहुन्नरी व धीट विद्यर्थिनी होती. विशेष म्हणजे, ताराचे वडील हे त्यावेळी टेनिस या खेळात पंचगिरी करीत असत. पंच म्हणून त्या खेळात ते नांवाजलेले होते. सर्व क्रीडा क्षेत्रात त्यांची उल्लेखनीय कामगिरी असूनही विशेषतः टेनिस या खेळातील त्यांची ख्याती ऐकिवात होती. मी क्रिकेट खेळत होतो म्हणून ताराच्या वडिलांविषयी मला जाणीवपूर्वक माहिती होती. साहजिक मॅट्रिकनंतर-कालांतराने पुढे आमचे मार्ग बदलले आणि आम्ही सर्वजण दाही दिशांना विखुरले गेलो. परंतु, माझी क्रिकेटची आवड सुटली नव्हती. ज्यावेळी टेनिस या खेळात अंपायर म्हणून कामगिरी करणारे कोणीही नव्हते त्यावेळी ताराच्या वडिलांची टेनिसमध्ये अंपायर क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय प्रगती व जागतिक कीर्ती मिळविली होती. निरनिराळ्या वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या या सर्व बातम्या आमच्या वाचनात येत असत. अभिमानाची गोष्ट अशी की, त्यावेळी त्या क्षेत्रात मराठी म्हणून ते एकमेव होते. त्यांच्यासंबंधी वार्ता वाचतांना आपल्या शाळकरी मैत्रिणीचे ते नामवंत वडील म्हणून मला आनंदासहित आदर वाटत होता. क्रिकेट सुटल्यानंतर आशिया खंडातील सुप्रसिद्ध सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट मधून उच्च शिक्षण घेऊन मी अमेरिकेला आलो. थोडक्यात, मुंबईशी संपर्क तुटला. तरीही जे कांही वाचनात येईल ते अधुनमधून वाचीत होतो. त्यात मुख्यत्वे दादर, शिवाजी पार्क, शिवाजी पार्क जिमखाना येथील खेळाडू व मित्र मंडळींच्या वार्ता कळत होत्या. अचानक माझा मित्र

द्वारकानाथ-पपू संझगिरीचा एक लेख माझ्या वाचनात आला. त्यात त्याने लिहिलं होतं, *“१९८३ साली मी वर्ल्ड कपसाठी पहिल्यांदा इंग्लंडला गेलो तेव्हा जाण्यापूर्वी मी बॉब महादेवकर या विम्बल्डन पंचांना भेटलो होतो. कारण ते सातत्याने विम्बल्डनसाठी इंग्लंडला जात. माणूस रसिक आणि अवलिया..! खेळकर व विनोदी स्वभावाच्या महादेवकरांनी इंग्लंडच्या त्यांच्या अनुभवाबद्दल सांगून त्यांनी मला एक सल्ला दिला - ‘इंग्लिश बायका आणि इंग्लिश कंडिशन्स (इंग्लिश वातावरण) यावर कधी विश्वास टाकू नकोस. दोन्ही गोष्टी अत्यंत बेभरवशाच्या आहेत.”* इतक्या वेळा इंग्लंडला जाऊन माझा इंग्लिश बायकांशी ‘विश्वासघाताची शक्यता असलेल्या’ कुठल्याही बाबीबाबत संबंध आला नाही, पण इंग्लिश वातावरणाला मी इतक्या वेळा रंग बदलताना पाहिलं की सरड्यालाही कमीपणा वाटावा. त्यामुळेच फलंदाज किंवा गोलंदाज हा इंग्लिश कंडिशन्समध्ये यशस्वी होत नाही तोपर्यंत त्याच्या महानतेवर प्रश्नचिन्ह उभं केलं जातं, पण इंग्लिश वातावरण आता बदललंय का..? हे पपूचं विधान वाचल्यावर आश्चर्याने माझ्या भुंवया उंचावल्या. आणि मी विश्वास ठेवला तो भरंवशाचे ‘बॉब महादेवकर’ यांच्यावरच. असो.

मी अमेरिकेतून मुंबईला जेव्हा-जेव्हा गेलो किंवा जात होतो तेव्हा-तेव्हा ‘बॉब महादेवकर’ यांच्यावर दोन शब्द लिहिण्यासाठी त्यांची माहितीवजा दुर्मिळ फोटो मिळविण्याचे प्रयत्न करीत होतो, शोध घेत होतो. दुर्दैवाने त्यात मला कधीही यश आलं नव्हतं, येत नव्हतं. परंतु, माझे प्रयत्न, चिकाटी व जिद्द मी सोडली नव्हती. तारा मला म्हणाली होती की, *“जयंत, सध्या ती सर्व मालमत्ता माझ्या धाकट्या भावाची, संजीवची आहे. तू त्याला कॉन्टॅक्ट कर...”* नेहमीप्रमाणे मुंबईतील माझ्या धांवत्या मुक्कामात मला संजीवचा शोध घेणं जमत नव्हतं अथवा त्याला भेटण्याचा कधीही योग घेतां आला नव्हता. अर्थात, याला मीच जबाबदार होतो याची मला कल्पना होती. यावेळी मात्र मुंबईला गेल्यावर माझ्या सर्व इच्छा पूर्ण करायच्याच या ईर्षेने आम्ही नुकतेच गेल्या महिन्यात, फेब्रुवारीत मुंबईला जाऊन आलो. नेहमीप्रमाणे एके संध्याकाळी शिवाजी पार्क जिमखान्यात माझा जिवलग बालमित्र नवीन आंबुलकरला हिरवळीवर भेटायला गेलो तेव्हा नवीनने मला जिमखान्याचा चेअरमन

अविनाश कामतची ओळख करून दिली. यापूर्वी मी अविनाशची ख्याती जाणून होतो. त्याला सर्व जगाची इत्यंभूत माहिती असते. म्हणून मी कामत यांना पहिलाच प्रश्न विचारला की, *“मला ‘बॉब महादेवकर’ यांची माहिती मिळूं शकेल कां. तसेच, त्यांचा मुलगा संजीव याची भेट कशी होईल..?"* मंडळी, दैवी चमत्कार घडावा असं घडलं. कामत यांनी मला त्वरित थेट संजीव महादेवकर यांना फोन लावून दिला होता..!

*हे सर्व दुर्मिळ फोटो संजीव महादेवकरांच्या सौजन्याने व त्या कांही फोटोंचे कॅप्शन्स-व्यक्तींची नांवे नितिन कन्नमवार याच्या सौजन्याने...*



*१-२) दुर्दैवाने बॉब कुणाबरोबर आहेत हे माहित नाही... ३) महाराष्ट्राचे पहिले अर्थमंत्री बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्याकडून सन्मान-गौरव होतांना बॉब...*

दुसऱ्याच दिवशी आनंदाने संजीव मला त्याच्या गाडीतून घरी घेऊन गेला. तेथे माझं अनौपचारिकपणे उत्तम स्वागत व पाहुणचार झाला हे वेगळं सांगण्याची गरज नाही. त्यावेळी मी एका ऐतिहासिक वास्तूत प्रवेश करीत आहे याचा मला भास झाला होता. तेथे संजीवच्या वडिलांनी त्यांच्या टेनिसमधील पंच क्षेत्रात मिळविलेल्या असंख्य जागतिक कीर्तीची, पारितोषिकांची, गौरवास्पद मान सन्मानांची व दुर्मिळ छायाचित्रांची संग्रहालयाप्रमाणे योग्यतऱ्हेने दखल घेतली होती. थोडक्यात, ते पवित्र घर त्यांनीच व्यापलेले होते. हे सर्व अभिमानास्पद होतं, मी सुखावलो होतो. परोपकारी संजीवने मला हातचं न राखून, कुठलेही आढेवेढे न घेतां सढळ हस्ते सहकार्य करीत मदत केली होती. हा त्याचा साक्षेप वाखाणण्यासारखा होता. याआधी म्हटल्याप्रमाणे संजीव महादेवकरांचं घर मला ऐतिहासिक वाटलं त्याचं आणखी एक

कारण म्हणजे, संजीवची पत्नी सौ. उमा ही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य पत्करलेले क्रांतिकारक शिवराम हरी राजगुरू (ऑगस्ट २४, इ.स. १९०८; खेड, महाराष्ट्र - मार्च २३, १९३१; लाहोर, पंजाब) यांची नात लागते याचाही गोड शोध लागला होता..! हुतात्मा राजगुरू यांचं त्यांनी नांव घेतल्यावर माझ्या अंगावर अभिमानाने शहारे उभे राहिले होते... येथे मला राजगुरू यांची थोडक्यात माहिती देणे उचित वाटते. ती अशी: राजगुरू हे हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. डॉक्टर हर्डीकर यांच्या सेवा दलामध्ये असतानाच त्यांचा संबंध हा हिंदुस्तान रिपब्लिकन पार्टी या क्रांतीकारी संघटनेची आला चंद्रशेखर आझाद भगत सिंग आणि सुखदेव अशा क्रांतिकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले लाला लजपत राय यांच्यावर सॉंडर्स नावाच्या पोलिस अधिकाऱ्यांनी लाठीहल्ला केला त्यात जखमी होऊन मरण पावले त्याचा बदला घेण्यासाठी १७ फेब्रुवारी १९२८ रोजी राजगुरू, भगतसिंग यांनी लाहोर येथे सॉंडर्सवर गोळ्या घालून हत्या केली या त्याबरोबरच नॅशनल बॅंकेची लूट, क्रांतिकारक जोगेश चंद्रा चॅटर्जी यांची सुटका यातही राजगुरूंचा सहभाग होता. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग व सुखदेव, राजगुरु यांना फाशी देण्यात आली होती. माझी शाळेतील वर्ग मैत्रीण 'तारा' ही संजीवची सर्वात मोठी बहीण. नंतरचा भाऊ 'श्याम' याचं दुर्दैवाने मोटर सायकल अपघातात निधन झालं होतं. प्रथमच भेट झालेला संजीव हा भावंडात लहान आहे.



*१) संजीव, पत्नी उमा व त्यांची गुणी मुलं यांचेसह बॉब... २) नागपुरचा संबंध, परिचय व बॉब यांचे खास मित्र Union Minister of Information and Broadcasting मधील केंद्रीय मंत्री वसंतराव साठे... ३) संजीव व वसंतराव साठे...*




*१) बॉब यांचा एका खाजगी समारंभात गौरव होतांना... २) खासदार छगन भुजबळ व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत मागे पडून जलसंपदा मंत्री झालेले जयंत-राजारामबापू पाटील यांचे सोबत बॉब... ३) मुंबईच्या हॉटेल ताजमध्ये भाषण करतांना बॉब...*




*१) सुप्रसिद्ध टेनिस खेळाडू विजय अमृतराज, पंच बॉब महादेवकर व त्यांचा मुलगा संजीव, इंग्लंडला विम्बल्डन येथील भेटीत... २) Bob Mahadeokar Square-Chowk at Cooperage, Mumbai, near Maharashtra State Lawn Tennis Association (MSLTA)... ३) परवाच्या भेटीत मुंबईत संजीवच्या घरी, आपल्या वडिलांचा जपून ठेवलेला फोटो अभिमानाने दाखवितांना भावनावश झालेला संजीव...*

संजीव अभिमानाने वडिलांविषयी सांगत होता की, *"टेनिस क्रीडा प्रकारातील सर्वात प्रतिष्ठेच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत त्यांच्या वडीलांनी, भास्कर गोविंद महादेवकर ऊर्फ बॉब यांनी ४० वर्षांपूर्वी विम्बल्डनमध्ये आशियातर्फे पहिले पंच होण्याचा मान मिळवला होता. विम्बल्डनसारख्या स्पर्धेत पंच म्हणून भूमिका बजावण्याचा तो पहिला मान महाराष्ट्रातील मराठी माणसाला लाभला होता. मात्र तरीही वडिलांचे हे ऐतिहासिक यश काळाच्या पडद्याआड लपले गेले. माझ्या वडिलांनी सुरुवातीला टेनिसपटू म्हणूनच कारकीर्द घडवण्याचा विचार केला होता. मात्र त्यासाठी आवश्यक असलेली तंदुरुस्ती आणि आहाराचे नियम पाळणे त्यांना*

जमले नाही म्हणून त्यांनी आपले लक्ष पंचगिरीकडे वळविले होते. १९६३च्या डेव्हिस चषकापासून त्यांच्या पंच कारकीर्दीची सुरुवात झाली. १९७८ नंतर अनेक वर्षे त्यांनी डेव्हिस चषक आणि अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पंचाची भूमिका पार पाडली होती. याच वर्षी त्यांना विम्बल्डनचे पंचपद भूषवण्याची संधी मिळाली आणि त्यांना कधीच मागे वळून पाहावे लागले नाही. परिश्रमपूर्वक यश त्यांच्या मागे आपोआपच धांवून आले होते. पुढे विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पाच, अमेरिकन खुली टेनिस स्पर्धेत तीन आणि फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत दोन वेळा त्यांनी पंच म्हणून काम केले होते. त्यावेळी महान हॉलीवूड अभिनेता 'बॉब होप' यांच्यासारखी दिमाखदार दिसण्याची शैली व उत्तम पेहराव असल्यामुळे विम्बल्डनच्या अधिकाऱ्यांनी महादेवकर यांना 'बॉब' हे टोपणनांव दिले होते. मलासुद्‌धा टेनिसमध्ये आवड वडिलांनीच निर्माण केली होती. त्यामुळे वडिलांच्या योग्य मार्गदर्शनाखाली मीही उत्तम टेनिस खेळत असे. आमचा मुलगा डॉ. प्रणव याने आजोबांचे टेनिस मधील संस्कार पुढे नेले आहेत. शाळेतून राष्ट्रीय टेनिस स्पर्धेत तो चॅम्पियन होता.

त्यांचा जन्म २२ मे, १९२० साली नागपूर येथे झाला होता. लहानपणापासून त्यांना सर्व खेळांची आवड होती. तसेच, माझे वडील शिवाजी पार्क जिमखान्यातून क्रिकेट व बिलियर्ड्सही खेळत होते. भारत सरकारतर्फे ते फ्रिडम फायटर म्हणून घोषित केलेले होते. शिवाय, इंडियन फिल्म सेन्सॉर बोर्डचे अनेक वर्ष सभासद होते. आणि भारत सरकारच्या हिंदुस्तान अँटीबायोटिक्स, पुणे, येथील कंपनीचे ते एक बोर्ड ऑफ डिरेक्टर होते. सुरुवातीला क्रिकेटमध्ये त्यांनी उत्तम कामगिरी केली होती. एव्हडं असूनही त्यावेळी क्रिकेटमध्ये जे राजकारण खेळलं जात होतं अथवा त्यावेळी खेळलं गेलं या अनुभवानुसार त्यांनी क्रिकेटमध्ये दुर्लक्ष केलं. आणि आपले वडील हे उत्तम टेनिस खेळणारे होते म्हणून पुढे त्यांनी टेनिस या खेळात जास्त लक्ष दिलं. त्यातही त्यांची प्रगती उल्लेखनीय होती. त्यावेळी या खेळात पंचगिरी करणारे फार थोडे असत. कदाचित त्यामुळे त्यांनी त्यात शिक्षण घेतले व आपल्या व्यावसायिक यशाचा मार्ग मोकळा केला होता. संजीवच्या उच्च शिक्षित आई-वाडिलांचे एकमेकांच्या शेजारी रहाणारे वडील हे नागपूर येथील नामवंत न्यायाधीश होते.

*स्वभावाने ते अत्यंत दिलदार व दानशूर वृत्तीचे होते. सदैव होतकरूंना त्यांनी मार्गदर्शन केलं. भारतामधील अनेक नामवंत राज्य व केंद्रीय मंत्री त्यांचे मित्र होते. भारतातील टीव्हीचे जग 'ब्लॅक अँड व्हाइट' मधून रंगांच्या दुनियेत नेणारे माजी केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अशी ओळख असणारे ज्येष्ठ कॉँग्रेस नेते वसंत साठे हे नागपूरचे होते. त्यामुळे त्यांचे ते जवळचे व खास मित्र होते. तरीही त्याचा गैरफायदा त्यांनी कधीही घेतला नव्हता. कौतुकाची बाब अशी की, महादेवकरांनी टेनिस या खेळाला सर्वप्रथम टीव्हीवर आणलं नव्हे, त्याचं दर्शन घडवलं होतं. दादर, शिवाजी पार्क जिमखान्यातून त्यांना ओळखणारे अथवा त्यांचे इतर असंख्य चाहते, परिचित व्यक्तींना महादेवकरांनी बिम्बल्डनमधील महत्वाच्या खेळांचे पासेस-तिकिटें त्यांच्या सौजन्याने (पाहुणे म्हणून मोफत) दिली होती व देत असत. थोडक्यात, आपल्या क्षेत्रात मोठे असूनही त्यांना गर्व नव्हता व कुठल्याही गोष्टीचा त्यांनी गवगवा केला नव्हता. हे निश्चितच कौतुकास्पद व अभिमानास्पद होय. Merck Sharp & Dohme (MSD) या जागतिक कंपनीत प्रथम ते नोकरी करीत होते. टेनिसची या खेळात अंपायर अथवा पंचगिरी करणारे कमी असत. म्हणून त्यांनी त्या खेळाकडे अधिक लक्ष घातले होते. लवकरच आपल्या कर्तबगारीवर त्यांनी टेनिस या खेळात राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर 'चेअर अंपायर' व विम्बल्डन, ऑस्ट्रेलियन, फ्रेंच व यूएस ओपन (Grand Slam Tennis Tournaments) मध्ये चीफ चेयर अंपायर' म्हणून यशस्वी कामगिरी पार पाडली होती. हे सर्व निश्चितच अभिमानास्पद व भूषणावह होय..!"*

मुंबईच्या भेटीला माझा शिवाजी पार्कचा मित्र, Tennis Officials Indiaचा संस्थापक व विश्वभरच्या टेनिस स्पर्धेतील Grand Slam Tennis Tournaments मधील नवं कॉम्पुटर तंत्र जेणेकरून त्याचा खेळ चालू असतांना टेनिस कोर्टावर खेळाडूंशी आमनेसामने संपर्क-संबंध येत नाही, रागाने बाचाबाची होत नाही त्या Hawk-Eyeचा Chief Supervisor-Operator, आंतराष्ट्रीय कीर्तीचा नितिन कन्नमवार मला भेटला होता. तो 'The Bombay Bob' महादेवकारांबद्दल श्रद्धेने व आदराने काय म्हणतो ते कृपया येथे जरूर वाचावे:


https://www.facebook.com/TennisOfficialsIndia/posts/toi-remembers-the-bombay-bobtennis-officials-india-felicited-late-shri-bob-mahad/917768328299919/

*(Hawk-Eye is a computer system used in numerous sports such as cricket, tennis, Gaelic football, badminton, hurling, rugby union, association football and volleyball, to visually track the trajectory of the ball and display a profile of its statistically most likely path as a moving image.)*

सांगायला आनंद वाटतो की, अत्यंत साध्या स्वभावचा व वेस्टर्न रेल्वेत असलेली मानाची नोकरी सांभाळून वर्षातील सुमारे सहा महिने टेनिससाठी निरनिराळ्या देशात-परदेशात सतत फिरणारा मितभाषी नितिन कन्नमवार हा एक उत्तम कुक आहे. हे सर्वश्रुत असल्यामुळे बिम्बल्डनला बहुतेक सहकारी-मित्र-मंडळी त्याची चातकासारखी वाट पाहात असतात. तसेच, अभिमानाची व आनंदाची बाब अशी की, पुढील वर्षी (2021) नितिनच्या बिम्बल्डनमधील टेनिस कारकिर्दीला रौप्य महोत्सवी-२५ वर्ष पुरी होताहेत. हे निश्चितच कौतुकास्पद आहे.




*१) Shivaji Park Gymkhana tennis court... २) Tennis Association of India TOIचे संस्थापक नितिन कन्नमवार inducted Bob in its 'TOI Grandslam Club' posthumously by presenting the trophy to Bob Mahdeokar's son, Sanjeev Mahadeokar at Shivaji Park Gymkhana tennis courts on Sunday, 8th November, where he was a member and played his tennis... 3-४) आनंदाने संजीव मला ती ट्रॉफी दाखवितांना व त्या गौरवास्पद ट्रॉफीचा फोटो...*



*१) बॉब आपल्या मानाच्या खुर्चीवर... २) महाराष्ट्राचे पूर्वीचे राज्यपाल सादिक अली यांचे सोबत... ३) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचेबरोबर... ४) बॉब सोडून इतर व्यक्ती माहित नाहीत...*



*१-२-३) बॉब सोडून इतर व्यक्ती माहित नाहीत...*

संजीव पुढे म्हणाला, *"विम्बल्डनमध्ये माझ्या वडिलांची पंचगिरी अपरिचितच राहिली आहे. कारण, त्यांनी स्वत:सुद्धा कधीच आपल्या कर्तृत्वाचे गुणगान गायले नव्हते. किंबहुना खेळाडूंच्या नांवावर पुरस्कार दिले जातात. मात्र पंचांच्या नांवावर पुरस्कार दिला जात नाही. तसेच, त्यांनाही शासनातर्फे कोणताही प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आलेला नाही. हे अत्यंत खेदजनक होय. मात्र कुपरेज येथील महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेजवळील नाथालाल पारिख मार्गाला एप्रिल २०१८ मध्ये 'आंतरराष्ट्रीय टेनिस पंच बॉब महादेवकर चौक' असे नाव देण्यात आले आहे."* तसं पाहतां माझ्या वडिलांनंतर भारतातर्फे अनेकांनी पंचांची भूमिका वठवली. त्यापैकी २०१२च्या विम्बल्डनमध्ये भारताच्या सर्वाधिक पाच पंचांनी पात्र ठरण्यात यश मिळवले होते. नितिन कन्नमवार, ललित मोहन सिंग, अभिषेक मुखर्जी, पायल जैन आणि प्रवीण कुमार यांनी आतापर्यंत ही कामगिरी केली आहे. नितीन यांनी

आठ तर ललित व अभिषेक यांनी तीन वेळा पंचाचे काम केले आहे. २०१७च्या रॉजर फेडरर आणि मरिन चिलिच यांच्यातील पुरुषांच्या अंतिम फेरीच्या लढतीत अभिषेक यांना पंच म्हणून काम करण्याचे भाग्य लाभले होते.

संजीवचे वडील हे उत्तम अभ्यासक होते. वाचनाची त्यांना विशेष आवड होती. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व वाखाणण्यासारखे होते. तसेच, त्यांचं बोलणं आणि त्यांचा स्वभाव अत्यंत विनोदी, मनमोकळा, अत्यंत साधा व परोपकारी होता. जागतिक कीर्तीचे अंपायर असूनही ते गर्विष्ठ नव्हते. कुटुंबप्रेमी महादेवकर यांनी समाजसेवा-सामाजिक कार्य व अनेकांना मदत करणं याकडे कधीही दुलक्ष केलं नाही. ते सदैव उत्तम पोशाखात असत-Well Dressed. त्यांच्या विनोदी बोलण्यात व भाषणातून त्यांची हुशारी दिसून येत असे. त्यात विनोदी कोट्या, कुणाला न दुखवतां कोपरखळ्या व चुटके ते सहजपणे देत असत. नांवाप्रमाणे ते 'कोटी-भास्करच' होते म्हणानां. Now you will realise why he was called or honored or named Bob (Hope) Mahdeokar. मुंबईतील सर्व प्रतिष्ठित क्लबचे ते सभासद होते.

उदा. Bombay Gymkhana, P.J.Hindu Gymkhana, Matunga Gymkhana, Dadar Club & Honarary Member of Shivaji Park Gymkhana, etc. तसेच, ते R.M.P. Doctor होते व त्यांनी Sports Medicine मध्ये Diplomaही घेतला होता..!

१६ फेब्रुवारी २००२ मध्ये वयाच्या ८४व्या वर्षी महादेवकर यांचे निधन झाले होते. संजीवच्या भेटीत असे कळले की, येत्या मे, २०२० पासून त्याच्या वडिलांचे म्हणजे, पंच बॉब महादेवकर यांचे जन्म शताब्दी वर्ष साजरं होत आहे. माझ्या दृष्टीने हा विलक्षण योगायोग होता. आणि ही बातमी संजीवने मलाच प्रथम सांगितली होती. मला खात्री आहे की, जागतिक कीर्तीचे बॉब महादेवकर यांचं जन्म शताब्दी वर्ष, विम्बल्डनसह जेथे-जेथे टेनिस खेळलं जातं तेथे तेथे साऱ्या विश्वात सन्मान व गौरवपूर्वक साजरं केलं जाईल यात शंका नाही. यामुळे विस्मरणात गेलेल्या त्यांच्या सुवर्ण स्मृती जागृत होतील. तसेच, शिवाजी पार्क जिमखान्याच्या

Wall of Fameवर बॉब महादेवकर यांना मानाने पहिले मराठी पंच-चेअर अंपायर म्हणून समाविष्ट केले जाईल व टेनिस कोर्टवर त्यांचे कायम स्वरूपाचे स्मारक उभारले जाईल अशी आशा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे, शिवाजी पार्क जिमखान्यातर्फेही जाहीरपणे बॉब महादेवकर यांचं जन्म शताब्दी वर्ष साजरं केलं जाईल, त्याची योग्य दखल घेतली जाईल अशी सदिच्छा व्यक्त करतो..! असो.



*१-२-३) बॉब सोडून इतर व्यक्ती माहित नाहीत...*



*१) पत्रकार शरद कोटणीस व बॉब... २) पत्रकार के. एन. प्रभू व मश्रुवाला यांचे सोबत बॉब... ३) निरोप देण्यासाठी आलेले, इंगलंडच्या दौऱ्यावर जातांना एअरपोर्टवर आपल्या कुटुंबासोबत बॉब. त्यावेळीचे सुप्रसिद्ध टेनिस खेळाडू Shahin Ghouse & in middle - Ilyas Ghouse - Tennis Players from Mumbai...*




*१) Bob with world famous tennis player Mr & Mrs. Jimmy Conners...*

*२) Wimbledon, Center Court Championship Tournament's complimentary pas-ticket... 3) Mr. Sanjiv & Mrs. Uma Mahadeokar...*

सांगायला अभिमान वाटतो की, दादर, मुंबईत मी शिवाजी पार्कला ज्या ‘शाहाडे सदन’ या बिल्डिंग मध्ये रहातो त्या एकाच वास्तूमध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, शिक्षण व इतर क्षेत्रातील नामवंत खेळाडू अथवा व्यक्ती रहात असत. एक म्हणजे, जागतिक कीर्तीचे पंच माधव गोठोस्कर. आनंदाची बाब अशी की, आज ते ९१ वर्षाचे असूनही शिवाजी पार्क जिमखान्यात दररोज फेरी मारतात. दुसरा म्हणजे, मुंबईचा रणजी ट्रॉफीमधील अष्टपैलू उत्तम खेळाडू कै. विश्वनाथ बोन्द्रे. तिसरा, उत्कृष्ट विकेट किपर व बॅट्समन नवीन आंबुलकर. आणि १९५२-५३ साली महिलांच्या एकेरी स्पर्धेत कॉलेज, मुंबई विद्यापीठ व बॅडमिंटनमधील रिझर्व्ह बँक गव्हर्नर्स ट्रॉफी विजेती एकेरी महिला चॅम्पियन असलेली माझी थोरली बहीण इरावती कुळकर्णी. ज्यावेळी नंदू नाटेकर पुरुषांचा व माझी बहीण महिलांची विजेती होती. तसेच, माझे वडील सुप्रसिद्ध इंग्रजीचे प्राध्यापक व मराठी मधील नामवंत साहित्यिक प्रा. वि. ह. कुळकर्णी अशी सुप्रसिद्ध, नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती शाहाडे सदनमध्ये रहात होती. हे कौतुकास्पद नव्हे कां..? माझं नशीब किंवा भाग्य असं की, या सर्व वातावरणातून जातांना, अमेरिकेत गेली चाळीस वर्ष राहूनही आजही माझं व शिवाजी पार्कचा नातं तुटलेलं नाही. आणि उशिरा कां होईना, गेली अनेक वर्ष मी ज्यांचा शोध घेत होतो ते आदरणीय ‘टेनिस मधील बॉस, बॉब महादेवकर’ यांच्या घराण्याशी नुकतंच संजीवमुळे जुळलेलं नातं. ही पुण्याई असून ईश्वराची व शिवतीर्थाची कृपा होय..! माझ्या या लेखणीतून विस्मृतीत गेलेल्या महान महादेवकरांच्या स्मृती कायम स्वरूपात पुनः जागृत होतील, उजळल्या जातील यात शंका नाही. एक मात्र निश्चित पुण्य माझ्या पदरी पडलं. याचा मला मनस्वी आनंद झाला. असो. विश्वकिर्ती मिळालेले या तळपत्या तीर्थरूप भास्करांना, टेनिस मधील ग्रँड स्लॅम बॉस, बॉब महादेवरांना माझे शतशः प्रणाम, मानाचा मुजरा व माझी आदरांजली..! My Hats Off to Him..!!

जयंत विठ्ठल कुळकर्णी.
e-mail: jvkny1@gmail.com

टीप: योगायोग असा होता की, परवा संजीव जेव्हा मला त्याच्या घरी घेऊन गेला तेव्हा ध्यानी आलं की, त्याच ‘समृद्धी सोसायटीमध्ये’ पूर्वी माझी थोरली चुलत बहीण रहात होती व स्कुल ऑफ आर्टमधील माझी मैत्रीण भारती मोहिते रहात होती. त्यावेळी त्या 'समृद्धी सोसायटीमध्ये' आम्ही अनेकवेळां जात होतो. दुर्दैवाने, महादेवकर तेथे रहात होते याची माहिती नव्हती... असो. हा लेख सफळपूर्ण होण्यासाठी मुंबईतील आमच्या थोड्या मुक्कामात मला प्रेमाने, जाणीवपूर्ण व निस्वार्थीपणे मदत झाली अथवा केली त्यांची नांवे अशी:

संजीव महादेवकर, छायाचित्रकार सतीश शेवडे, शिवाजी पार्क जिमखान्याचे चेअरमन अविनाश कामत, माझा जिवलग बालमित्र नवीन आंबुलकर व टेनिस मधील Hawk-Eye नितिन कन्नमवार. या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. धन्यवाद.

विशेष टीप: तसं पाहतां संजीव महादेवकरने माझ्या झोळीत त्यांच्या वडिलांच्या अनेक दुर्मिळ फोटोंची माहितवजा अनमोल भर घातली होती. परंतु, बऱ्याच फोटोंमधील व्यक्तींची नांवे,

प्रसंग व क्षण त्याला माहित नव्हते किंवा त्या फोटोंमागे त्याची माहिती नव्हती. हे त्याचं व माझंही दुर्दैव होतं. परंतु, संजीवने त्याकडे दुर्लक्ष न करतां त्याचा जरूर शोध-मदत घेऊन ते कार्य वेळ निघून जाण्यापूर्वी पूर्ण करावं, मनावर घ्यावं अशी माझी संजीवला नम्र विनंती आहे. आणि तो हे कार्य निश्चित व जाणीवपूर्वक पूर्ण करेल याची मला खात्री आहे. महत्वाचं कारण म्हणजे, मे, २०२० पासून त्याच्या वडिलांचं, साजरं होणारं जन्म-शताब्दी वर्ष..!

समाप्त.

---